# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आयुक्त/०२ /2023-24
आयुक्त यांचे कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दि.29/04/2023

## आदेश

विषय :- महानगरपालिकेचे सन 2018-19 ते 2020-21 चे लेखापरीक्षण बाबत

संदर्भ:- 1) स्थानिक निधी लेखा, नवि मुंबई यांचे पत्र क्र.स्था.18/ब/मनपा/18-19 ते 21-22/मनपालेप/ 167 दि.24/02/2023

2) स्थानिक निधी लेखा, नवि मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.स्था.18/ब/मिरा भाईंदर/मनपा/18-19 ते 21-22/मनपालेप/276 दि.17/04/2023

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन 2018-19 ते 2020-21 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण दि.08/05/2023 पासुन करण्यात येणार असल्याने संदर्भ क्र.2 वरील कार्यालयीन आदेशान्वये महाराष्ट्र शासन सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षा स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई कार्यालयाकडुन कळविण्यात आले आहे.

सदर लेखापरीक्षणाचे काम योग्य प्रकारे व सुरळीत पार पाडण्यासाठी डॉ. का. रा. जाधव मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:-

1) संचालक
संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा
महानगरपालिका, लेखापरीक्षण, नवी मुंबई- 400701
2) डॉ. का.रा.जाधव., मुख्य लेखा व वित्त अधिकारी
3) मुख्यलेखापरीक्षक
4) उपायुक्त (सर्व)
5) सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महानगरपालिका लेखापरीक्षण, नवी मुंबई ४०० ७०१.
☎/🖷 : ०२२-२७५६१६२३ Email ID : jdmca-mahalfa@mah.gov.in Website:www.mahalfa.maharashtra.gov.in

क्र.स्था.१८/ब/------ मनपा/१८-१९ ते २१-२२/मनपालेप/ १६७ दिनांक :२४/०२/२०२३

लेखापरीक्षण प्राधान्य/सुचनापत्र

प्रति,

मा. आयुक्त,

मिरा-भाईदर महानगरपालिका

भाईदर.

**विषय** : महानगरपालिकेचे सन २०१८-१९ ते २०२०-२१ चे लेखापरीक्षणाबाबत.

**संदर्भ** :- १. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक - स्थानिले-१०१०/प्र.क्र.२६-ब/विमा प्रशा., दिनांक ३१/०३/२०११.

२. मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय, यांचे परिपत्रक दिनांक २१/०७/२०२२.

३. महालेखाकार यांचे पत्र Training/DLFA/OW/९२, दिनांक २१/१२/२०२२ (यशदा पुणे येथे टीजीएस प्रशिक्षण कालावधी १८/०१/२०२३ ते २०/०१/२०२३)

महोदय,

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम ३ मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येते की, आपल्या महानगरपालिकेचे २०१८-२०१९ ते २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे लेख्यांचे लेखापरीक्षण आगामी कालावधीत हाती घेण्यात येणार आहे. सदरचे लेखापरीक्षण सुरु होण्याचा दिनांक यथावकाश आपणास कळविण्यात येईल.

सदर लेखापरीक्षणाचे काम योग्य प्रकारे व सुरळीत पार पाडण्यासाठी आपल्या महानगरपालिकेतील **मुख्य लेखा व वित्त अधिकारी अथवा मुख्य लेखापरीक्षकांना** नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक केल्यास लेखापरीक्षण पथकांस, संबंधित विभागाकडुन लेखापरीक्षणासंबंधी आवश्यक सुविधा, तसेच लेख्यांच्या संबंधातील सर्व अद्यावत प्रमाणके, विवरणपत्रे, विवरण पत्रव्यवहार, टिपण्या किंवा इतर दस्तऐवज प्राप्त होणे तसेच लेखापरीक्षण पथकाकडुन विभागांना अर्धसमासपत्रे देणे, अनुपालने प्राप्त करुन घेणे या कामात सुसुत्रता येऊन लेखापरीक्षणाच्या मंजुर श्रमदिनाचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी लेखापरीक्षण पथक व महानगरपालिकेतील विभाग यांत ताळमेळ राहण्यास मदत होईल.

१.लेखापरीक्षणात निदर्शनास आलेल्या आक्षेपांचे निराकरण त्वरीत करण्याबाबत संबंधीतांना सूचना द्याव्यात जेणेकरून लेखापरीक्षणाचे कामकाज बरेच सुलभ होईल आणि त्यामुळे नंतर होणारा पत्रव्यवहार कमी होईल.

२.महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ४ नुसार लेखापरीक्षणासाठी लेखे सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे.

३.आपल्या महानगरपालिकेत लेखापरीक्षण सुरु झाल्यानंतर **सांख्यिकी विवरणपत्रे १ ते १० पुर्णपणे भरुन लेखापरीक्षण पथकाकडे पहिल्या आठवड्यात सादर करण्यात यावे**. (प्रत संलग्न)

४.उक्त अधिनियमांचे कलम ६ नुसार दस्तऐवज सादर करण्यात संबंधीत व्यक्तीला हजर राहण्यास इत्यादी फर्मावण्याचा लेखापरीक्षकांस अधिकार आहे. कलम ६ अन्वये मागणी करूनही लेखापरीक्षणास अभिलेख सादर न केल्यास कलम ७ नुसार रू. २५,०००/- पर्यंत दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

लेखापरीक्षणाचे कामकाज सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिका आयुक्त यांनी लेखापरीक्षण सुरु झाल्यापासून एक आठवडयाच्या आत सर्व खातेप्रमुखांची बैठक घेवून लेखापरीक्षण पथकास सहकार्य करण्याबाबत सूचना द्याव्यात. तसेच सदर लेखापरीक्षणाची Entry Conference आयोजित करण्यात यावी. Entry Conference करीता संपूर्ण लेखापरीक्षण पथक, उप संचालक (मनपालेप), व आवश्यकतेनुसार मा. संचालक/ सहसंचालक (मनपालेप) उपस्थित राहतील व विषयसूची पुढीलप्रमाणे असेल.

i. लेखापरीक्षण पथकाचा परिचय.

ii. लेखापरीक्षणाचे स्वरुप व व्याप्ती.

iii.महानगरपालिकेत अस्तित्वात असलेली कार्यपध्दती / लेखांकन पध्दती वापरण्यात येत असलेले वित्तीय नियम आणि प्राधिकार, प्रमुख विभाग व लेखापरीक्षण कामकाजाचा आवाका.

iv.लेखापरीक्षण करावयाच्या वित्तीय वर्षात अंमलबजावणी झालेल्या / सुरु असलेल्या बाहय अनुदानित योजनांची तपशीलवार माहिती.

v.संगणकीकृत लेखे ठेवण्यात येत असल्यास संगणकीकृत प्रणालीची माहिती.

vi.मागील लेखापरीक्षणाचाअनुभव विचारात घेता करावयाची सुधारणा.

सदर लेखापरीक्षणाकरिता मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालय यांचे परिपत्रक क्रमांक ५९३, दिनांक २१/०७/२०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे **सन २०१८-१९ ते २१-२२ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखे** परिपत्रकांत दिलेल्या सुचनांनुसार स्थायी समितीच्या मंजुरीसह लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. सदर प्रकरणी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

**१५ वा वित्त आयोगाचे मार्च २०२३ पर्यंतचे निधीच्या खर्चाचे लेख्यांचे प्राधान्याने लेखापरीक्षण करुन स्वतंत्र अहवाल निर्गमीत करण्यात येईल.**

संदर्भ क्रमांक १ व ३ नुसार नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली यशदा,पुणे येथे दिनांक १८/०१/२०२३ ते २०/०१/२०२३ या कालावधीत झालेल्या प्रशिक्षणामधील संदर्भानुसार निष्पादन लेखापरीक्षा (Performance Audit) करण्यात येईल. ज्यामध्ये महानगरपालिका लेखापरीक्षणातील विकास कामांचे लेखापरीक्षण करताना तसेच शासनाच्या विशेष निधी अंतर्गत केलेल्या कामांचे लेखापरीक्षण करताना पाणीपुरवठा योजना, जलनिस्सरणीच कामे, मलनि:सारण कामे, घनकचरा व्यवस्थापन विषयक कामे, उद्याने निर्मिती तथा दुरुस्ती, जून्या साहित्याचे निर्लेखन साठा व इतर

विकास कामांना प्रत्यक्ष भेटी देऊन आवश्यक उपयोगितेच्या आधारे वस्तुनिष्ठ निरीक्षणे लेखापरीक्षण अहवालात नोंदविण्यात येतील.

**सन २०११-१२ ते २०१५-१६ या वर्षामधील पुनर्विलोकन अहवालामधील समाविष्ट/प्रस्तावित परिच्छेद वगळुन** इतर प्रलंबित परिच्छेदांची अनुपालने निकाली काढण्यासाठी विशेष शिबीराचं आयोजन लेखापरीक्षण पथक आपणांकडे उपस्थित झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत करण्यात येईल. त्याअनुषंगाने प्रलंबित परिच्छेदांची अनुपालने आवश्यक दस्तऐवजासंह लेखापरीक्षण पथकाकडे तपासणीसाठी देण्यात यावीत.

आपल्या महानगरपालिकेच्या लेखापरीक्षणास विलंब होत असल्यास, **सन २०११-१२ ते २०१५-१६ या वर्षामधील पुनर्विलोकन अहवालामधील समाविष्ट/प्रस्तावित परिच्छेद वगळुन**, किमान ७५ ते १०० प्रलंबित परिच्छेदांची अनुपालने आपणांकडे तयार असल्यास तसे या कार्यालयास कळविण्यात यावे, जेणेकरुन आपल्या महानगरपालिकेच्या प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा होण्यासाठी विशेष शिबीराचे आयोजन करता येईल.

आपल्या महानगरपालिकेचे लेखापरीक्षण प्रलंबित परिच्छेदांच्या अनुपालन तपासणीसह विहीत मुदतीत पुर्ण होण्यासाठी आपल्या सहकार्याची विनंती.

आपला,

(माधव नागरगोजे)
संचालक,
संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

१. मा. अप्पर मुख्य सचिव, (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग - २, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :**

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मिरा-भाईदर महानगरपालिका.

२. मुख्य लेखापरीक्षक, मिरा-भाईदर महानगरपालिका.

३. उपसंचालक (मनपालेप), उपविभाग दोन, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, महानगरपालिका लेखापरीक्षण,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,नवी मुंबई ४०० ७०१.
☎/📠: ०२२-२७५६१६२३, ई-मेल-jdmca-mahalfa@mah.gov.in, संकेतस्थळ-www.mahalfa.maharashtra.gov.in

वाचा : १) वित्त विभाग शासन निर्णय क्र.स्थानिले-१०१० / प्र.क्र.२६-ब / विमा प्रशा, दि.३१/०३/२०११.
२) संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे पत्र क्र.स्था.१८/ब/मनपालेप/१४५८, दि.२३/०८/२०१२.
३) या कार्यालयाचे आदेश क्र.स्था.१८/ब/मनपा/१८-१९ ते २१-२२/मनपालेप/१६७, दिनांक २४/०२/२०२३.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.स्था.१८/ब/मार्गदर्शक सूचना/मनपा/२२-२३/मनपालेप/५५७, दिनांक १७/०३/२०२३.

---

क्र.स्था.१८/ब/मिरा-भाईदर मनपा/१८-१९ ते २०-२१/मनपालेप/ २७६ दिनांक :१७/०४/२०२३

## कार्यालयीन आदेश

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ च्या सूचनापत्र निगमित केल्यानुसार या आदेशान्वये मिरा-भाईदर महानगरपालिका २०१८-१९ ते २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांचे पथक गठीत करण्यात येत आहे. लेखापरीक्षण पथकाने लेखापरीक्षणाचे कामकाज दिनांक ०८/०५/२०२३ पासुन सुरु करावे. उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ च्या मार्गदर्शक सूचनानुसार संबंधित पथक प्रमुखांनी कामकाज करावे.

| अ.क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. विजय वाघचौरे | सहाय्यक संचालक तथा पथक प्रमुख |
| २ | श्री. दिलिप पोळ | लेखापरीक्षा अधिकारी |

मिरा-भाईदर महानगरपालिका २०१८-१९ ते २०२०-२१ या वित्तीय वर्षांचे लेखापरीक्षण करण्यासाठी विहीत केलेल्या श्रमदिनापैकी ८०० श्रमदिन वापरण्यात यावेत. आवश्यकतेनुसार श्रमदिवस कमी व जास्त करण्यात येतील.

नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहित केलेली मार्गदर्शक तत्वे व मानके, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम व मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ आणि लागू असलेले विविध अधिनियम, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, आदेश, कार्यालयीन आदेश/नियमपुस्तिका इत्यादी मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण पूर्ण करावे. लेखापरीक्षण कालावर्धात लेखापरीक्षकाच्या पाक्षिकदैनंदिन्या व नियतकालिक अहवाल वेळेवर सादर करावेत व लेखापरीक्षण परिच्छेद देखिल मेन्स प्रणालीवर नियमित अपलोड करावेत. तसेच लेखापरीक्षणाचा प्रारुप अहवाल या कार्यालयाने अंतिम मंजूर केलेल्या श्रमदिनाअखेर किंवा लेखापरीक्षण संपल्यानंतर कमाल एक आठवडा यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत या कार्यालयास सादर करावा. पथक पमुखांनी आवश्यकतेनुसार विभाग व श्रमदिन यांची विभागनी करावी व तसे या कार्यालयास अवगत करावे.

(शुभांगी द.माने)
सह संचालक (मनपालेप)
स्थानिक निधी लेखा परीक्षा
नवी मुंबई.

प्रति,

१. श्री. विजय वाघचौरे,सहायक संचालक तथा पथक प्रमुख

२. श्री. दिलिप पोळ, लेखापरीक्षा अधिकारी

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरीता.

१. मा. आयुक्त, मिरा-भाईदर महानगरपालिका.

२. मुख्य लेखापरीक्षक, मिरा-भाईदर महानगरपालिका.

३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मिरा-भाईदर महानगरपालिका..

प्रत :- माहितीकरिता.

१. अहवाल शाखा (मनपालेप).

२. आस्थापना शाखा (मनपालेप).

३. लेखा शाखा (मनपालेप).

४. संबंधित नस्ती.